अनुसया उर्फ तुळशी लिंगवत वगैरे वि.

सरस्वती बाबाजी नाईक वगैरे

## निशाणी क्रमांक ३३ वरील आदेश

१. प्रस्तुतच्या अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.६ हीने वादीच्या दाव्यास कैफियत देण्यास झालेला विलंब माफ होवून तिच्याविरूध्द झालेला 'विना कैफियत' आदेश रद्द होवून कैफियत स्वीकारण्याची विनंती केलेली आहे.

२. प्रतिवादी क्र.६ हीच्या मते, वादीने प्रस्तुतचा दावा हा हक्कप्रस्थापना होऊन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.६ यांना दाव्याचे समन्सची बजावणी झालेनंतर त्यांना आपल्या विधीज्ञांशी संपर्क साधून कैफियत दाखल करणेकरीता आवश्यक ती माहिती व कागदपत्रे ही महसूल दप्तरातील कागदपत्रे वेळीच उपलब्ध झाली नाहीत. तसेच प्रतिवादी क्र.६ यांचे जवळचे नातेवाईक यांचे दरम्यानचे काळात दुःखद निधन झाल्याने त्यांना आपल्या वकीलांशी संपर्क साधून कैफियत दाखल करणेस विलंब झालेला आहे. प्रतिवादी यांनी सदरचा विलंब जाणुनबुजून केलेला नाही. प्रतिवादी क्र.६ यांना कैफियत दाखल करणेची संधी न मिळालेस त्यांचेवर अन्याय होणार आहे. याउलट कैफियत दाखल झालेस वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नसून दावा गुणदोषावर चालून अंतिम न्यायनिर्णयास सुलभच होणारे आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.६ यांनी त्यांच्याविरूध्द झालेला 'विना कैफियत' आदेश रद्द होवून कैफियत स्वीकारण्याची विनंती केलेली आहे.

३. वादीने नि.३६ कडे आपले म्हणणे दाखल करुन अर्जास आक्षेप घेतला आहे. त्यांचे असे कथन आहे की, प्रस्तूतचा अर्ज खोटा व खोडसाळ असून वादी यांना मान्य व कबूल नाही. प्रस्तुत कामी प्रतिवादी क्र.६ यांना दि.२४/०३/२०२५ रोजी दाव्याचे समन्सची बजावणी झालेली असून ते प्रस्तुत कामी वकीलांमार्फत दि.०८/०४/२०२५ रोजी हजर झालेले आहेत. प्रतिवादी यांनी कैफियत दाखल करणेस जाणूनबुजून टाळाटाळ केलेली आहे. सबब अर्ज खर्चासह नामंजूर करणेची विनंती केलेली आहे.

४. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. वादी यांनी आपल्या म्हणणे मध्ये प्रतिवादी क्र.६ यांनी अर्जात नमुद केलेली कारणे संयुक्तीक असून दाव्यास विलंब होण्याकरीता कैफियत मुदतीत दिली नसल्याचे कथन केलेले आहे. अभिलेखाचे व रोजनाम्याचे अवलोकन

केले असता प्रस्तुत कामी प्रतिवादी क्र.६ यांना दाव्याचे समन्सची बजावणी झालेची दिसून येते. प्रतिवादी क्र.६ प्रस्तुत कामी हजर झाली आहे. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.६ यांनी दिनांक १४/०७/२०२५ रोजी दिलेला आहे. यावरून असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.६ यांना कैफियत देण्यास विलंब झालेला आहे. सदरचा विलंब प्रतिवादी क्र.६ यांनी जाणुन बुजून केलेला नाही असे कथन केलेले आहे. दाव्याचा निकाल गुणदोषावर लागण्याकरीता प्रतिवादी क्र.६ यांची कैफियत अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल. त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रतिवादी क्र.६ यांनी प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठयर्थ आपले प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जातील प्रतिवादींचे कथन विचारात घेण्यास कोणतीही हरकत दिसून येत नाही. परंतु कैफियत दाखल करणेस झालेला विलंब व त्या अनुषंगाने वादीची झालेली गैरसोय योग्य तो खर्च आकारुन भरुन काढणे गरजेचे आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**-:: आदेश ::-**

१. प्रतिवादी क्र.६ यांचा नि.३३ वरील अर्ज वादीस खर्चादाखल रक्कम रूपये २००/- (रु.दोनशे मात्र) देणेच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र.६ विरूध्द 'विना कैफियत' असा पारीत झालेला आदेश रद्द करण्यात येतो.

३. प्रतिवादी क्र.६ यांनी खर्चाची रक्कम पुढील तारखेस वा तत्पूर्वी वादीस देणेची आहे. त्यानंतरच त्यांची कैफियत अभिलेखावर नोंदविण्यात येईल.

४. प्रतिवादी क्र.६ यांनी खर्चाची रक्कम वादीस देण्यास कसूर केल्यास प्रस्तुतचा आदेश आपोआप रद्द होईल.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

KUMBHAR RANJANA GOVIND
Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2025.11.25 17:49:52 +0530

दिनांक- २५/११/२०२५ (श्रीमती आर. जी. कुंभार)

ठिकाण- सावंतवाडी सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर),

सावंतवाडी